REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १७ ऑगस्ट, १९३८ | अंक ३३

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें

या बँकेची २१ वी वार्षिक साधारण सभा रविवार ता. ४ सप्टेंबर, १९३८ रोजीं दुपारीं १२॥ वाजतां नूतन मराठी विद्यालयाचे दिवाणखान्यांत भरून अहवाल, ताळेबंद व नफ्याची वांटणी मंजूर करणें, हिशेबतपासनीस नेमणें, डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक करणें, पोट-नियम दुरुस्ती वगैरे कामें करण्यांत येतील. तरी सर्व सभासदांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे. निवडणुकीची वेळ नेहमींप्रमाणें सकाळीं ८ ते १० व दुपारीं ३ ते ५ आहे.

ता. ९ ऑगस्ट, १९३८. द. वि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

## पुणें जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लिमिटेड,

## नोटिस.

वरील बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १८ माहे सप्टेंबर १९३८ ई॥ रोजीं दुपारीं २ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या इमारतींत भरणार असून तींत अहवाल-वाचन, ताळेबंद मंजूर करणें, डायरेक्टर निवडणूक व पोटनियम दुरुस्ती वगैरे कामें होणार आहेत. सभेची तपशीलवार कार्यक्रमपत्रिका सभासदांकडे अलाहिदा पाठविण्यांत आली आहे. त्याच दिवशीं दुपारीं दोन ते तीन वाजेपर्यंत पुढील सालाकरितां डायरेक्टर बोर्डाची निवडणूक होणार आहे. तरी सर्व "अ" वर्ग बिनकर्जदार व बँकेकडून कर्ज घेतलेल्या सभासदांनीं साधारण सभेस व डायरेक्टरांच्या निवडणुकीस अगत्य हजर रहावें अशी विनंति आहे.

डायरेक्टरांच्या निवडणुकीसाठी नॉमिनेशन पेपर्स बँकेचे ऑफिसांत मिळतील व ते तारीख ३१ ऑगस्ट १९३८ चे पांच वाजण्यापूर्वी मॅनेजरकडे बँकेचे कचेरींत दाखल करावे, कळावें.

पुणें शहर
ता. १४ आगस्ट, १९३८
हुकूमावरून
रा. ब. वसगडेकर,
मॅनेजर.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,३४,४५० वसूल झालेलें भांडवल १,१७,१६५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. Y. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

# विविध माहिती

**स्त्री कामगारांना खाणींत बंदी**

हिंदुस्थानमधील खाणींमध्यें जमिनीखालीं काम करण्यास स्त्री कामगारांना आपण बंदी केली असल्याचें हिंदुस्थान सरकारनें इंटरनॅशनल लेबर ऑफिसला कळविलें आहे.

**रेडिओवर सरकारचा खर्च**

ग्रेट ब्रिटनचें क्षेत्रफळ हिंदुस्थानाच्या क्षेत्रफळाच्या मानानें सतरावा हिस्सा आहे. तथापि त्या देशाचा ब्रॉडकास्टिंगवरील भांडवली आणि चालू खर्च हिंदुस्थानांतील ब्रॉडकास्टिंग खात्याच्या खर्चाचे मानानें अनुक्रमें १२ आणि १५ पट आहे.

**ट्रेझरी बिलांवर ९ आणे १० पै व्याजाचा दर**

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. ९ आणे १० पै इतका पडला.

**विमान मार्गानें सोन्याची निर्गत**

६ ऑगस्ट रोजीं संपलेल्या आठवड्यांत कराचीहून विमान मार्गानें २,०८,५३३ रुपयांचे सॉव्हरिन रवाना झाले.

**लँड ॲक्विझिशन ॲक्टाखालील व्याजांत उतार**

लँड ॲक्विझिशन ॲक्टाखालीं घेण्यांत आलेल्या जमिनींबाबतच्या मोबदल्याचे रकमेवरील बाकीवर सध्या सहा टक्के दरानें व्याज आकारण्यांत येतें. हा दर चालू व्याजाच्या दराचे मानानें फार भारी आहे, म्हणून तो उतरवून चार टक्के करण्याचा मुंबई सरकारचा मानस आहे. ही दुरुस्ती एका बिलाचे स्वरूपांत प्रांतिक विधिमंडळापुढें मंजुरीसाठीं येईल.

**हिंदी साखरेचा उच्च दर्जा**

हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या साखरेचा दर्जा जावा साखरेच्या बरोबरीचा असल्याचें कानपूर येथील इंपीरिअल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजीच्या डायरेक्टरांनीं आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे. " हिंदी साखरेची प्रतवारी लावण्यांत आली असून वेगवेगळ्या ४८ प्रकारांची साखर आज बाजारांत आहे. उच्च दर्जाच्या साखरेचें उत्पादन वाढविण्याकडे कारखानदारांचा कल आहे " असेंहि रिपोर्टांत म्हटलेलें आहे.

**चीनची लोकसंख्या**

चीन देशाची लोकसंख्या किती आहे, ह्यासंबंधीं निरनिराळ्या अंदाजांत बरीच तफावत दिसते. कांहीं अधिकृत अंदाजांप्रमाणें ती ४४ कोटि तर कांहीं अंदाजाप्रमाणें ४८½ कोटि भरते. एका अधिकारी फ्रेंच लेखकाचा अजमास २५ कोटींचा आहे. त्या देशांत जन्मणाऱ्या अर्भकांपैकीं शेकडा साठ बालपणींच मरण पावतात, असा त्याचा हिशेब आहे.

**विमाविषयक नवीन कायदा**

विमाविषयक नवीन कायदा १ आक्टोबर रोजीं अंमलांत येणार असें प्रसिद्ध झालें होतें. १ जानेवारी, १९३९ पर्यंत तो अंमलांत येणार नाहीं असें आतां समजतें.

**बँकांस सुटी**

शुक्रवार, ता. १९ ऑगस्ट रोजीं गोकुळअष्टमीनिमित्त बँका बंद राहतील.

**टाकाऊ पोलादास मिन्हाइक**

दोन ब्रिटिश कंपन्यांनीं जर्मनीस २० हजार टन टाकाऊ पोलाद ( स्क्रॅप ) नुकतेंच विकलें आहे.

**प्रांतिक सरकारांची आर्थिक योजना**

सेलम येथील अखिल भारतीय खादी आणि स्वदेशी प्रदर्शनाचें उद्घाटन सर विश्वेश्वर अय्या ह्यांनीं केलें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत योजनात्मक आर्थिक धोरणाची हिंदुस्थानांत तीव्र आवश्यकता असल्याचें सांगितलें. प्रत्येक प्रांतिक सरकारनें एक आर्थिक सल्लागार मंडळ नेमावें, पंचवार्षिक योजना आखावी, त्यासाठीं पैशाची तरतूद करावी आणि योजना यशस्वी करण्याकरितां योग्य अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, असें त्यांनीं सुचविलें.

**अमेरिकेंतील दारूबंदीची अंमलबजावणी**

अमेरिकेमध्यें ३० जून, १९३२ अखेर १२½ वर्षें दारूबंदीची अंमलबजावणी चालू होती. ह्या मुदतींत एकूण ७½ लक्ष लोकांवर खटले भरण्यांत आले. त्यांपैकीं ५ लक्ष लोकांस शिक्षा होऊन सरकारास २०½ कोटि रुपये दंडाचे रूपानें उत्पन्न मिळालें.

**ग्रेटब्रिटनमधील मोटारींचें उत्पादन**

ग्रेटब्रिटनमध्यें १९३७ सालीं एकूण ३ लक्ष, ९० हजार खासगी मोटारी बनविण्यांत आल्या. लॉऱ्या आणि बसेस ह्यांच्या उत्पादनाचा आकडा १ लक्ष, १८ हजार होता. मोटारींवरील आणि पेट्रोलवरील करांपासून सरकारास सुमारें १०३ कोटि रुपये मिळाले.

**अमेरिकन दांपत्याची प्रवासाची आवड**

मि. आणि मिसेस डी. एफ. रॉबर्टसन ह्या अमेरिकन दांपत्यानें एकूण २६ वेळां पृथ्वीप्रदक्षिणा केली आहे. गेल्या ५ तारखेस हें दांपत्य मुंबई बंदरांत उतरलें. ही त्याची मुंबई शहरास ५० वी भेट आहे.

**ट्यूब रेल्वे स्टेशनांत थंड हवेचा पुरवठा**

लंडन शहरांतील रस्त्यांखालील ट्यूब रेल्वेच्या स्टेशनांमधील उष्णतामान बिघडूं नये आणि तेथें ताज्या थंड हवेचा प्रवाह चालू रहावा ह्यासाठीं नवी यंत्रसामुग्री बसविण्याची योजना चालू आहे. सुमारें तीस नवीं यंत्रें चालू झालीं, म्हणजे असल्या यंत्रांची संख्या शंभरावर जाईल.

**बंधमुक्त राजबंद्यांस काम देण्याची योजना**

बंधमुक्त राजबंद्यांच्या बेकारीवर उपाय म्हणून एक कंपनी स्थापन करण्याच्या आणि अनेक उद्योगधंदे तिच्या मार्फत काढावयाच्या योजनेचा बंगालमध्यें विचार चालू आहे.

**१ पौंड चहास ४५० रुपये**

ग्लासगो (स्कॉटलंड) येथील प्रदर्शनास ना. आगाखान यांनीं नुकतीच भेट दिली, त्यावेळीं तेथील चहा विभागांत त्यांचें स्वागत करण्यांत आलें. त्यांस देण्यांत आलेला चहा ज्या पत्तीपासून बनविण्यांत आला होता, ती पत्ती कोणत्याहि इतर चहापेक्षा महामाईची होती. तिचा बाजारभाव १ पौंड चहास ४५० रुपये असा आहे.

**बिहारमध्यें सहकारी चळवळीची पुनर्घटना**

सहकारी चळवळीची मजबूत पायावर पुनर्घटना करण्याचे कामीं सरकारास सहाय देण्यासाठीं बिहार प्रांतिक सरकारनें दहा सभासदांची एक कमिटी नेमली आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| ३१-७-३८ ते ६-८-३८ | ७०,७८,७९८ |
| ७-८-३८ ते १३-८-३८ | ४७,४८,२४१ |
| २१-९-३१ ते १३-८-३८ | ३,१८,९६,५७,६८५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३९८ |
| २ आयात वाढली, निर्गत रोडावली; पुढें काय ! | ३९९ |
| ३ गेल्या सहामाहीचें सिंहावलोकन ... ... | ४०० |
| ४ स्फुट विचार<br>सहकारी संस्था आणि नाठाळ कर्जदार–सरकारनें दिलेली योग्य समज–विदेशी विमा शास्त्रज्ञाची निवड–पुनरुक्ति हें समर्थन नव्हे–सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया | ४०१ |
| ५ ताळेबंद कसा करावा ! | ४०३ |
| ६ उतारूंच्या सुखसोयी | ४०३ |
| ७ फेसामुळें दूध किती मरतें ! | ४०४ |
| ८ "ब्रि. हिंदुस्थानांत बनविलेलें" ... | ४०४ |
| ९ खंडकऱ्यांच्या संरक्षणाचा कायदा ... ... | ४०५ |
| १० ग्रेट ब्रिटनचें संरक्षणात्मक धोरण ... ... | ४०६ |
| ११ "लिक्विडेशन तहकूब करूं नका" ... | ४०६ |
| १२ निवडक बाजारभाव | ४०७ |



# अर्थ

बुधवार, ता. १७ ऑगस्ट, १९३८


## आयात वाढली, निर्गत रोडावली.

### पुढें काय ?

ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून राज्यतंत्राच्या दृष्टीनें वेगळा झाल्याकारणानें ह्या देशाच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या आकड्यांमधून ब्रह्मदेशाची जगांतील इतर देशांशीं होणारी आयात-निर्गत आतां वगळणें आवश्यक झालें आहे. जपान, चीनप्रमाणें ब्रह्मदेश हें स्वतंत्र राष्ट्र झालें आहे आणि त्याच्याशी होणारे आयात-निर्गतीचे प्रत्यक्ष व्यवहार तेवढेच हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांत गणले जातील. ह्या कारणानें गेल्या वर्षांतल्या हिंदी व्यापाराचे आकडे आणि त्याच्या मागच्या सालांतले तत्सम आकडे ह्यांची परस्परतुलना करतांना ब्रह्मदेशाचें विभक्त होणें ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. असें केलें असतांहि एप्रिल, १९३७ ते मार्च, १९३८ अखेर ह्या वर्षांत झालेल्या हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचा वृत्तांत, ब्रिटिश सरकारचे हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि सिलोन ह्या देशांतले व्यापार-प्रतिनिधी, सर टॉमस ऐनस्कोव्ह, ह्यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्यावरून आयातींत वाढ, निर्गतींत घट आणि हुंडणावळीचा कमजोरपणा ह्या तीन गोष्टी प्रामुख्यानें लक्षांत येतात.

मार्च, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी हिंदुस्थानानें आयात केलेल्या मालाची किंमत १७३३/४ कोटि रुपये भरली. म्हणजे, त्यापूर्वीच्या बारा महिन्यांचे मानानें आयातींत ४८ कोटि रुपयांची वाढ झाली. ह्या वाढत्या आयातीचे बरोबर निर्गतींत प्रमाणशीर वाढ तर झाली नाहींच; उलट त्यांत १३ कोटींची घट पडून निर्गत मालाची किंमत १८९ कोटि रुपयेच भरली. सोन्याची निर्गतहि कमी झाली; तथापि, चांदीची आयातहि त्या प्रमाणांत उतरल्यामुळें, सोन्या-चांदीच्या आयात-निर्गतीच्या वजावाटीमुळें एकूण किंमतींत फार मोठा फरक पडला नाहीं आणि ह्या धातूंच्या निवळ निर्गतींत केवळ १४ लक्ष रुपयांचीच घट झाली. परदेशांतून आयात होणाऱ्या परंतु पुनः निर्गत होणाऱ्या मालाची किंमत हिशेबांत धरली नाहीं, तर एकूण आयात-निर्गतीच्या आकड्यांतील तफावत १९३६–३७ सालीं ९२३/४ कोटि रुपये होती ती १९३७–३८ सालीं ३०३/४ कोटि रुपयांवर आल्याचें आढळून येतें. हिंदुस्थानास ग्रेटब्रिटनमध्यें होम चार्जेस आणि इतर देणीं भागवावयाचीं असतात आणि त्यासाठी आयात-निर्गतीमधील अनुकूल तफावत उपयोगी पडते. आयातीपेक्षा निर्गत जितकी जास्त, त्यामानानें ग्रेटब्रिटनमध्यें रकमा जमा करणें अधिक सोपें जातें. ही तफावत कमी कमी होत गेल्यामुळें निर्गत व्यापारावर आधारलेल्या हुंड्यांच्या सहायानें ग्रेट ब्रिटनमध्यें हिंदी देणें भागवण्याची सोय करण्यास अडचण पडते आणि हुंडणावळीच्या दरावर ताण पडतो. सोन्याच्या निर्गतीमुळें हा ताण आजवर फारसा भासला नाहीं; तथापि, सुवर्णनिर्गतींत घट होत गेली असल्यानें हुंडणावळीच्या प्रश्नास आतां महत्त्व प्राप्त झालें आहे. ह्या परिस्थितीस तोंड देण्यास रिझर्व्ह बँक समर्थ आहे, असें सांगण्यांत येत आहे. म्हणजे, तिचे लंडनमध्यें रोखे आणि शिलका आहेत, त्यांतून ती खर्च करणार आहे.

हिंदी मालाची निर्गत कमी होण्याचें प्रमुख कारण म्हणजे जपाननें हिंदी कपाशीची मर्यादित प्रमाणांत केलेली खरेदी हें होय. १९३७–३८ मध्यें जपानची कपास खरेदी १६१/२ कोटि रुपयांनीं कमी झाली. गळिताचीं आणि द्विदल धान्यें, इमारती लाकूड, इत्यादींच्या निर्गतीतहि घट पडली. एकूण माल परदेशी कमी गेला आणि बाजारभावहि उतरलेले होते, ह्यामुळें निर्गतमालास किंमतहि चांगली आली नाहीं. आयातीचे आकड्यांत वाढ दिसते, ह्याचीं कारणें (१) ब्रह्मदेशांतून येणारा माल आतां अंतर्गत व्यापाराचे सदरांत येत नाहीं, आणि (२) १९३७-३८ च्या पहिल्या कांहीं महिन्यांत युरोपांतील युद्धसंभवामुळें मालाचे आयातींत आणि त्याचे किंमतींत झालेली चढ, हीं होत. १९३६-३७ च्या मानानें वृत्तांतसालीं, हिंदुस्थानानें ६१/२ कोटि जास्त रुपयांची कपास आयात केली, ह्यावरून अमेरिकन आणि इजिप्शन कापसाची स्वस्ताई आणि सुबक कापड करण्याची हिंदी गिरण्यांची वाढती प्रवृत्ति हीं निदर्शनास येतात. धान्यांची आयातहि ज्यास्त झालेली आढळते.

आयात मालाची छाननी केली असतां, ब्रिटिश मालाचा खप वाढत असल्याचें दिसून येतें. ही वाढ प्रत्येक प्रकारच्या मालाचे बाबतींत झालेली आहे, असे १९३७–३८ सालविषयक आकडे दर्शवितात. कपास–कापड आणि लोखंडी नळीचे पत्रे ह्यांच्या आयातीचे बाबतींत मात्र ग्रेटब्रिटनची पीछेहाट झाली आहे. सुमारें २ कोटि रुपयांचें ब्रिटिश कापड हिंदुस्थानांत कमी खपलें आणि पत्र्यांच्या आयातीचे किंमतींत १९ लक्ष रुपयांची घट झाली. मोटारींच्या रबरी टायर्सची आयातहि कमी झाली; परंतु त्याचें कारण कलकत्ता येथील डनलॉपचा कारखाना हिंदुस्थानांतच माल तयार करूं लागला आहे, हें होय. म्हणजे, परदेशांतून टायर्स येण्याऐवजी, स्वदेशांतीलच एक विदेशी कारखाना आतां त्या पुरवूं लागला आहे. जपानी मालाच्या किंमती चढल्या असून, त्याची आयात उतरली आहे. त्यामुळें जपानच्या अनिष्ट स्पर्धेसंबंधाच्या तक्रारींची तीव्रता कमी झाली आहे. जर्मनी, अमेरिका आणि इटली ह्या देशांतून अधिकाधिक माल हिंदुस्थानांत उतरूं लागला आहे. खालील तक्त्यांत ह्या सर्व देशांची, हिंदुस्थानांतील

आयातीचे दृष्टीनें तुलना केली आहे:—

३१ मार्च अखेर संपणारें वर्ष

| | १९३६-३७ | | १९३७-३८ | |
|---|---|---|---|---|
| | रुपये (लक्ष) | एकूण आयातीशी शतमानानें प्रमाण | रुपये (लक्ष) | एकूण आयातीशी शतमानानें प्रमाण |
| ग्रेटब्रिटन | ४८,०८ | ३८·४ | ५१,८२ | ३०·० |
| जपान | २१,२५ | १७·० | २२,२३ | १२·७ |
| जर्मनी | १२,१४ | ९·७ | १५,३१ | ८·७ |
| अमेरिका | ८,१६ | ६·५ | १२,९० | ७·५ |
| इटली | १,२१ | १·० | २,५७ | १·७ |

वरील समालोचनावरून हिंदी आयात-निर्गत व्यापाराची परिस्थिति लक्षांत येईल आणि हिंदुस्थान देशाची निर्गत रोडावत असून त्याची आयात वाढत असल्याचें दिसून येईल. राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें तफावतीमधील ही घट इष्ट नाहीं. ह्या संबंधीं हिंदी व्यापारी मंडळें आज कित्येक महिने तक्रार करीत आहेत आणि हुंडणावळीच्या दरांत योग्य तो बदल करण्याची आणि परराष्ट्रांशीं व्यक्तिशः व्यापारी करार करण्याची आवश्यकता प्रतिपादीत आहेत. राष्ट्रसभेच्या कार्यकारी मंडळानेंहि ह्या प्रश्नाचें महत्त्व जाणून त्याबाबत विचार चालविला आहे. प्रांतिक सरकारांच्या लोकहितसंवर्धक योजनांचा आणि हुंडणावळीच्या प्रश्नाचा संबंध निकटचा कसा आहे, ह्याचें विवेचन "अर्था" मध्यें वेळोवेळ आलेलें आहे. रिझर्व्ह बँकेनें हुंडणावळीबाबत पढाकार घेतल्याविना हिंदुस्थान सरकारास कांहीं करतां येत नाहीं, ह्या मुद्यांतील फोलपणाहि "अर्था"नें स्पष्ट केलेला आहे. आतां ह्यापुढें कालहरण होणें इष्ट नाहीं, हें सरकारनें ओळखून योग्य त्या तजविजीच्या मार्गें लागलें पाहिजे.

## गेल्या सहामाहीचें बँकिंगच्या दृष्टीनें सिंहावलोकन

हिंदुस्थानांतील व्यापारी बँकांमध्यें इंपीरिअल बँक ऑफ इंडियास प्रतिष्ठित महत्त्वाचें स्थान आहे. त्या संस्थेच्या व्यवहारांची परिस्थिति एकूण हिंदी बँकिंगच्या धंद्याची आणि ह्या देशांतील व्यापारी व सांपत्तिक घडामोडींची निदर्शक असणें साहजिक आहे. तिचा व्याप इतका विस्तृत आहे कीं देशांतील उद्योगधंदे, व्यापार, चलन, पत, हुंडणावळ व भांडवल ह्यांचे बाबतींत होणाऱ्या उलाढालींचें प्रतिबिंब तिच्या व्यवहारांत दिसून आल्यास आश्चर्य नाहीं. इंपीरिअल बँकेच्या चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीच्या कारभाराचा वृत्तांत पुढच्या आठवड्यांत तिच्या भागीदारांपुढें मांडण्यांत येईल. त्यांत देशाच्या आर्थिक उलाढालींचें केलेलें सिंहावलोकन अत्यंत मननीय आहे आणि त्याचें दिग्दर्शन येथें केलें आहे. वृत्तपत्रांत वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे त्यावरून बँकेच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील पैशाच्या बाजाराची गेल्या सहा महिन्यांत स्थिति काय होती, ह्याची उद्बोधक माहिती मिळते. इतर बँकांनीं ती स्वतःच्या अनुभवाशीं पडताळून पहाण्यासारखी आहे आणि सामान्य लोकांसहि ती उपयुक्त वाटेल.

कोणत्याहि देशांतील मध्यवर्ती बँकेच्या व्याजाचा दर हें तेथील धंदे, व्यापार व चलन ह्यांच्या परिस्थितीचें महत्त्वाचें गमक समजण्यांत येतें. त्यांचे बाबतींत विशेष गडबड झाली तरच हा दर बदलण्यांत येतो. ह्या गडबडींचें इष्ट प्रकारानें नियमन करण्याचे हेतूनेंच बँक रेट जरुरीप्रमाणें कमी-जास्त करण्यांत येतो असें म्हटलें असतां तें अधिक वस्तुस्थिति-निदर्शक होईल. येथील रिझर्व्ह बँकेच्या व्याजाचा दर दीर्घकालपर्यंत तीन टक्के असाच राहिला आहे, ही गोष्ट इंपीरिअल बँकेच्या वृत्तांतांत नमूद केलेली आहे. उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांमध्यें गेल्या सहामाहींत पैशास चांगली मागणी होती, ह्यावरून आर्थिक चलती ध्वनित होते. तथापि, पैशाची टंचाई तर भासलीच नाहीं, पण त्याचा पुरवठा भरपूर असल्यानें व्याजाचे दर नमतेच राहिले ही महत्त्वाची पैशाच्या बाजाराची बाजू अहवालांत पुढें मांडलेली आहे. तिचा अनुभव इतर बँकांस आलेला आहे ह्यांत संशय नाहीं. बँकांच्या व्यवहारांचें वजन तपासण्याची दुसरी कसोटी म्हटली म्हणजे त्यांनीं गिऱ्हाइकांस दिलेलीं कर्जें, घेतलेल्या ठेवी आणि बाळगलेली शिल्लक ह्यांच्या रकमांची असते. रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या ( शेड्यूल्ड ) बँकांसंबंधाचे आकडे वेळोवेळीं प्रसिद्ध होतात ते वस्तुस्थितीचें उत्कृष्ट निदर्शक मानण्यास हरकत नाहीं. चालू वर्षाचे प्रारंभीं त्या बँकांनीं दिलेल्या कर्जांची एकूण रकम ११५ कोटि रुपये होती, ती एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्याचे अखेरीस १३२ कोटि झाली, पण जून अखेर १२२ वर उतरली. त्या बँकांजवळच्या ठेवी २४२ कोटि रुपयांच्या होत्या, त्यांची रकम सहा महिन्यांचे अवधींत २३५ कोटींवर खालीं आली. दर वर्षांतले पहिले चार महिने व्यापाराच्या चलतीचे असतात, आणि पुढें त्यांत शिथिलता उत्पन्न होते, हा नेहमीचा अनुभव आहे.

गेल्या सहामाहींत तिच्या प्रारंभाच्या मानानें शेतीच्या मालाचे बाजारभाव अस्थिर असून त्यांची प्रवृत्ति उतरण्याकडे होती. सहामाहीअखेर मात्र ह्या प्रवृत्तीस आळा बसून भाव स्थिरावल्यासारखे दिसत होते. सोन्याची निर्गत कमी झाली आणि चांदीची आयात व निर्गत जवळ जवळ सारखी झाली. सोनें व चांदी मिळून ७ कोटि रुपयांनीं आयातीपेक्षा निर्गत अधिक झाली. परराष्ट्रीय हुंडणावळ एप्रिलच्या सुमारास घसरली पण लवकरच ती सावरली. युरोपमधील राजकीय अस्वस्थतेचा सरकारी रोख्यांच्या किंमतीवर विशेष परिणाम झाला नाहीं. मध्यवर्ती सरकारनें काढलेल्या कर्जास चांगली मागणी आली. एकूण २५½ कोटि रुपयांची मागणी सरकारनें स्वीकारली, त्यांपैकी ६ कोटि रुपये रोख मिळाले आणि १९½ कोटि रुपये किंमतीच्या जुन्या रोख्यांचें नवीन कर्जांत रूपांतर करण्यांत आलें. १९३७ सालच्या पहिल्या सहामाहींत ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर सरासरीनें १ रु. ० आ. ५ पै पडला होता आणि गेल्या सहामाहींत तो १ रु. ६ आ. ६ पै इतका बसला. इंपीरिअल बँकेस गेल्या सहामाहींत ३९½ लक्ष रुपये इतका निवळ नफा झाला. ह्यांतून करमाफ १२ टक्के डिव्हिडंड भागीदारांस द्यावें अशी डायरेक्टरांच्या बोर्डाची सूचना आहे.

### विदेशी कपाशीचें प्रमाण

अहमदाबादेंतील गिरण्यांत खपणाऱ्या एकूण कपाशीपैकीं शेकडा २७ इतकी कपास विदेशी असते. मुंबई शहरांत हें प्रमाण शेकडा २१ इतकें पडतें.

### अहमदाबाद शहरांतील गिरणी कामगार

अहमदाबाद शहरांतील लोकसंख्येमध्यें शेकडा २० लोक गिरणी कामगार आहेत.

# स्फुट विचार

## सहकारी संस्था आणि नाठाळ कर्जदार

सहकारी आणि सावकारी व्यवहार यांचेमधील महत्त्वाचा फरक आम्हीं "अर्था"मध्यें मागें स्पष्ट करून दाखवला आहे. आमच्या प्रांतिक सरकारनें जाहीर पत्रकाचे द्वारें ही गोष्ट जनतेपुढें विशद रीतीनें आतां मांडल्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. सहकारी पतपेढ्या आणि बँका यांचे कर्जदार कित्येक वेळां पैशाची परतफेड नाठाळपणानें टाळीत असतात. अशा लोकांचे विरुद्ध कायद्यांतल्या योजनेप्रमाणें कडक उपाय योजावे अशी मागणी झाली असतां तिची अंमलबजावणी व्हावी तशी होत नाहीं आणि त्यामुळें इतर कर्जदारांसहि नाठाळपणा करण्यास उत्तेजन मिळतें. कर्जफेडीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी विक्रीस काढणें हें पतपेढीस किंवा बँकेस बरें वाटत असतें असें नाहीं; आणि आपणांविरुद्ध कडक उपाय योजले जातील असें कर्जदारांस समजलें असतां परतफेड होते आणि ह्या उपायांची आवश्यकताहि फारशी भासत नाहीं असा अनुभव आहे. पतपेढ्यांच्या सभासदांस अनेक प्रकारच्या सवलती मिळत असतात आणि आपल्या सहकारी संस्थांचें देणें वेळेवर देऊन टाकण्याची नैतिक जबाबदारीहि त्यांचेवर असते. विशिष्ट कार्यासाठी पतपेढ्या सभासदांस कर्जें देतात आणि त्या संस्थांच्या उपयुक्त कार्याचें यश कर्जदारांच्या नैतिक जबाबदारीच्या जाणीवेवर अवलंबून असतें. परतफेडीविषयींचे कडक नियम पेढीच्या सभासदांच्या सामुदायिक हितासाठी केलेले असतात. त्यांची अंमलबजावणीहि सभासदांनीं निवडलेल्या पंचांच्या सांगण्यावरूनच होत असते. असें असून कित्येक स्वार्थी सभासद पतपेढी आणि बँक ह्यांचे विरुद्ध गिल्ला करतात आणि त्यांचेविषयीं गैरसमज पसरवण्यास कारणीभूत होतात. कडक शिस्तीची उपाययोजना वास्तविक अपवादात्मक आहे आणि तिची अंमलबजावणी योग्य वेळीं झाल्यास पतपेढीची आढी नासून न जाण्यास सहाय होतें. ह्या प्रांतांत आतां काँग्रेस सरकार अधिकारारूढ झालें असून त्याचें धोरण शेतकरी वर्गास सवलती देण्याचें आहे, ह्या गोष्टीचा अवास्तव फायदा सहकारी पतपेढ्यांचे कांहीं नाठाळ सभासद घेऊं पहात असल्यानें ह्या संस्थांची स्थिति सुधारण्याच्या प्रयत्नांत व्यत्यय येत आहे. अशा वेळीं मुंबई सरकारानें ह्या लोकांस चांगली समज दिली आहे हें स्तुत्य आहे.

---

## सरकारनें दिलेली योग्य समज

सरकार आणि महसूल खात्याचे अधिकारी आपल्या नाठाळपणाकडे डोळेझाक करतील या कल्पनेनें सहकारी संस्थांचे सभासद कांहीं ठिकाणीं शक्यता असून आपली देणीं देण्याची टाळाटाळ करीत आहेत असें नजरेस आल्यावरून ही समजूत सर्वथा चुकीची आहे असें सरकारनें जाहीर केलें आहे. शेतकऱ्यांच्या हिताविषयीं सरकारास कळकळ आहे, पण त्याचा अर्थ नाठाळपणा तें चालू देईल असा कोणीहि करूं नये, असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांस कर्जफेडीबाबत अनेक सवलती देण्यांत येत आहेत, त्यांचें वर्णन करून त्यांचा फायदा न घेतां कर्जफेडीची जाणूनबुजून चुकवाचुकव करणारांची गय आपण करणार नाहीं, असें त्यांनीं स्वच्छ सांगितलें आहे. पतपेढ्यांच्या सभासदांची कायदेशीर जबाबदारी बाजूस ठेवली तरी त्यांची आपली संस्था आणि सहकारी बँक ह्यांचेसंबंधांत नैतिक जबाबदारी आहे ती त्यांनीं ओळखली पाहिजे आणि ठरलेल्या मुदतींत आपल्या कर्जाची फेड केली पाहिजे, ही गोष्ट सरकारनें प्रामुख्यानें निदर्शनास आणली आहे. व्याजाचे दर उतरवण्यांत आले आहेत, व्याजाच्या थकबाकीची सूट देण्यांत येत आहे, कर्जफेडीची हप्तेबंदी होत आहे, इत्यादि प्रकारच्या सवलती पतपेढ्यांच्या सभासदांस मिळत आहेत. स्मॉल होल्डर्स रिलीफ कायद्याचा फायदाहि त्यांस देण्यांत आला आहे. त्यांस शक्य तेवढें सहाय सरकार देत असतां कर्ज परत द्यावयाचेंच नाहीं असा हट्ट धरणारांविरुद्ध महसूल खात्याचे अधिकारी कडक उपायांची योजना करण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत, असें सरकारनें नाठाळ देणेदारांस निक्षून बजावले आहे. काँग्रेस सरकार झालें म्हणून तें निष्कारण नाठाळपणा करणाऱ्या कर्जदारांस उत्तेजन मिळेल असें धोरण कसें अंगिकारील, ही गोष्ट ह्या लोकांच्या लक्षांत यावयास हवी होती. सहकारी संस्थांच्या सभासदांची नैतिक जबाबदारी काय आहे ह्याचें दिग्दर्शन करून कांहीं अधिकारी व बिनअधिकारी लोकांमध्यें लवाद निवाड्यांच्या अंमलबजावणीबाबत पसरलेला गैरसमज सरकारनें दूर केला आहे ही प्रधानमंडळाची महत्त्वाची कामगिरी आहे, असें म्हटलें पाहिजे. सहकारी तत्त्व आणि व्यवहार ह्यांच्या सत्यस्वरूपावरहि ह्यामुळें चांगला प्रकाश पडला आहे हा एक लाभच आहे.

---

## विदेशी विमा शास्त्रज्ञाची निवड--असेंब्लींत नापसंती

सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सचे जागेवर एका युरोपियनाची नेमणूक केल्याबद्दल असेंब्लीची नापसंती व्यक्त करण्यासाठी श्री. चेटियार ह्यांनीं सभा तहकुबीची सूचना गेल्या आठवड्यांत आणली, ती ५६ विरुद्ध ५५ मतांनीं नापास झाली. "ह्या जागेस लायक असे फक्त सहा हिंदी ॲक्चुअरी होते, त्यांपैकी पांच जणांस पुरेसा अनुभव नव्हता. उरलेल्या ॲक्चुअरीची सध्याची कमाई सुपरिंटेंडेंटला मिळावयाच्या पगारापेक्षा पुष्कळच ज्यास्त आहे; तेव्हां अतिशय मोठा पगार देऊं केल्याखेरीज त्यानें ही जागा स्वीकारली नसती. नेमणूक केलेले मि. टॉमस हे कोणत्याहि हिंदी ॲक्चुअरीपेक्षा ज्यास्त लायक आहेत" असें सरकारतर्फे सर महमद झाफरुल्लाखान ह्यांनीं सांगितलें. अनुभवी हिंदी लोकांस बाजूस सारून तरुण ब्रिटिश मुलांची सरकारनें अनेक वेळां नेमणूक केलेली आहे, ह्याची जाणीव श्री. ना. म. जोशी ह्यांनीं करून दिली. "अनुभव मिळवीत असतांना चुका झाल्या तरी चालतील; परंतु माझें काम मीच करीन," अशी हिंदी जनतेची मागणी असल्याचें श्री. भुलाभाई देसाई ह्यांनीं सांगितलें. राष्ट्रीय सेवा करण्याची संधी मिळावी म्हणून कमी पगारावरहि काम करण्यास लायक हिंदी लोक पुढें येत आहेत, हें अनेक वक्त्यांनीं दाखवून दिलें. अखेर, वर सांगितल्याप्रमाणें सूचना नामंजूर झाली. लोकनियुक्त सभासदांपैकी एक गट सोडून बाकी सर्वांचा तहकुबी सूचनेस पाठिंबा होता. लोकमतास धाब्यावर बसवून आणि लायक हिंदी लोकांस बाजूस सारून विदेशी "तज्ज्ञां"ची वर्णी लावण्याचें सरकारी धोरण अजूनहि चालू रहावें ही आश्चर्याची गोष्ट आहे.

---

## पुनरुक्ति हें समर्थन नव्हे

हिंदुस्थानच्या नवीन राज्यघटनेचा कायदा प्रांतिक स्वायत्तेच्या स्वरूपांत अंशतः अंमलांत आला असून तिच्या फेडरेशन

विषयक भागाची अंमलबजावणी अजून व्हावयाची आहे. हा भाग ह्या देशांतील कोणत्याहि पक्षास मान्य नाहीं हें सुप्रसिद्ध आहे आणि त्यांत महत्वाचे फेरफार झाल्यावांचून त्यास कोणीच मान्यता देणें शक्य नाहीं यासंबंधानें शंका राहिलेली नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटनें दीर्घ विचार करून घटनेचा कायदा बनवला असून त्याचा प्रत्यक्ष अनुभव कांहीं वर्षेपर्यंत घेतला गेल्यावर त्यांत दोष असतील तर ते उघडकीस येतील आणि नंतरच ते दूर करण्याचा प्रश्न उद्भवेल असें ब्रिटिश मुत्सद्यांचें म्हणणें आहे. एका काळीं मद्रास हायकोर्टाचे न्यायाधीश असलेले मि. एडी ह्यांनी हिंदी राज्यघटनेचा चांगला अभ्यास केला आहे. त्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबईमध्यें प्रस्तुत विषयावर भाषण केलें आणि त्यांत हिंदी घटना कायद्याचें समर्थन केलें. तसें करतांना त्यांनीं वरील मुद्याचाच पुनरुच्चार केला. पार्लमेंट आजमितीस कायदा बदलण्यास तयार होणार नाहीं आणि त्याचा प्रयोग करून पहाणेंच आवश्यक आहे हें त्यांच्या भाषणाचें सार होतें. घटनेंतले दोष स्पष्ट दिसत आहेत आणि ते दाखवण्यांतहि आले आहेत. मग ते शोधून काढण्याचा किंवा अनुभवानें सिद्ध करण्याचा प्रश्नच कोठें उद्भवतो ? ब्रिटिश वसाहतींचा दर्जा हें नुसतें ध्येय म्हणून त्याच्याकडे पहात हिंदी लोकांनीं बसावें आणि त्यांच्यासारखी सत्ता आपणांस पुढें केव्हां तरी मिळेल त्या आशेवर समाधान मानावें ही मि. एडी ह्यांची अपेक्षा व्यर्थ आहे. घटनेच्या बाबतींत ब्रिटिश पार्लमेंटलाच सर्व अधिकार आहेत आणि ते हिंदी लोकमतास मान देऊन घटना कायद्यांत कोणताहि बदल करण्यास तयार नाहीं,असें पुन्हां पुन्हां सांगण्यानें कांहींच कार्यभाग होऊं शकत नाहीं. पार्लमेंटनें केलेला कायदा आणि त्याचें धोरण आम्हांस पसंत नाहीं असें उत्तर हिंदुस्थानच्या बाजूनें मिळणार. मग त्या प्रश्नास चालना मिळून त्याचे बाबतींत प्रगति कशी होणार ? ब्रिटिश मुत्सद्यांनीं कांहीं मिळतें घेण्याची तयारी दाखवावयास नको काय ?

---


### सेंट्रल एक्स्चेंज बँक ऑफ इंडिया

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पुरस्कारानें वरील हिंदी एक्स्चेंज बँकेची लंडन येथें स्थापना दोन वर्षांपूर्वी करण्यांत आली. तथापि, व्यापारांतील मंदीमुळें बँकेस पुरेसें काम न मिळाल्यामुळें तिनें १५ जुलै, १९३८ रोजीं बार्कलेज् बँकेकडे आपला सर्व व्यवहार सोंपविला. सेंट्रल एक्सचेंज बँकेची कचेरी आपले व्यवहार आवरून टाकण्यापुरती अद्याप चालू आहे. एक-दोन महिन्यांत ही कचेरी बंद होईल. एक्सचेंज बँकिंगचे क्षेत्रांत धडाडीनें पाऊल टाकण्याचा सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा प्रयत्न अशा रीतीनें अयशस्वी झाला, असें म्हटलें पाहिजे. हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापारास सहाय करणारी एकहि हिंदी बँक आतां चालू नाहीं. तथापि, हिंदी नेतृत्वाखालील सेंट्रल एक्सचेंज बँकेचें कायदेशीर अस्तित्व नाहींसें होणार नसून, मंदी दूर होईपर्यंत तिचें कामकाज मात्र तूर्त बंद रहाणार आहे. म्हणजे, पुनः योग्य प्रसंगीं नव्यानें पहिल्यापासून आरंभ करण्याचें कारण रहाणार नाहीं. बँकेच्या नोकरवर्गापैकी कांहीं जणांस ब्रिटिश बँकांतच जागा मिळेल, अशी अपेक्षा आहे.


# किर्लोस्कर

२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.



## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

किर्लोस्कर बंधु, लि. : किर्लोस्करवाडी, सातारा

## ताळेबंद तयार कसा करावा ?

### ( १ )

### नवीन कंपनी कायद्यानें केलेल्या सुधारणा

१५ जानेवारी, १९३७ रोजीं १९३६ चा दुरुस्त हिंदी कंपनी कायदा अंमलांत आला. ह्या कायद्यानें १९१३ च्या कंपनी कायद्यांत महत्त्वाचे अनेक फेरफार केले आहेत. कंपन्यांचे चालक आणि कंपन्यांच्या कारभाराशीं संबंध येणारे नागरिक ह्यांस त्याविषयीं माहिती असणें आवश्यक आहे. विशेषत: कंपन्यांच्या हिशेबासंबंधीं नवीन कायद्यानें केलेल्या दुरुस्त्या आणि सुधारणा त्यांनीं समजून घेणें जरूर आहे. ताळेबंदाच्या हिशेबाविषयीं येथें विवेचन केलें आहे, त्यांत प्रथम भांडवल आणि येणें बाजूविषयीं तपशील सांगितला आहे.

### भांडवल आणि देणें

#### ( १ ) भांडवल

अधिकृत, विक्रीस काढलेलें, खपलेलें आणि वसूल झालेलें भांडवल ह्यांचे स्वतंत्र आकडे दिले पाहिजेत आणि ह्या प्रत्येक शीर्षकाखालीं भांडवलाचे वेगवेगळया दर्जाचे प्रकार निर्दिष्ट केले पाहिजेत. विक्रीस काढलेल्या भांडवलांत रोख रकमा मिळाल्यावर दिलेले भाग आणि रोख रकम न घेतां दिलेले भाग हे स्वतंत्र दाखविणें आवश्यक आहे. बोनसचे भाग हे कोणत्या अधिकारानें देण्यांत आले, तें सांगितलें पाहिजे. भागांवरील मागणीच्या रकमेपैकीं कांहीं रकम वसूल झालेली नसल्यास ती वसूल भांडवलांतून वजा घातली पाहिजे आणि ती तशी दाखविली पाहिजे. मॅनेजिंग एजंटांकडून येणें बाकी आणि इतरांकडील बाकी स्पष्ट केली पाहिजे. डायरेक्टराच्या भागांवरील मागणीचा हप्ता थकलेला असल्यास, डायरेक्टराचे नांवें ही रकम कर्ज म्हणून पडेल आणि ती रकमहि ताळेबंदांत स्वतंत्रपणें दाखवावी लागेल.

#### ( २ ) गंगाजळी, सिंकिंग आणि इतर फंड

कंपनी कायद्यानें गंगाजळीचे खालील प्रकार सांगितले आहेत. ( अ ) रिझर्व्हज्, ( ब ) सिंकिंग फंड, ( क ) निवळ फायद्यांतून काढलेले इतर फंड्स, ( ड ) पेन्शन अगर विमा फंड आणि ( इ ) संशयित व बुडीत कर्जांची तरतूद. हे सर्व रिझर्व्हज् स्वतंत्रपणें दाखविले पाहिजेत; परंतु आरंभीची शिल्लक आणि त्यांतील वाढ अगर घट ही दर्शविण्याचें कारण दिसत नाहीं.

#### ( ३ ) डिबेंचर्स

ह्या शीर्षकाखालीं डिबेंचर्स कोणत्या तारणावर उभारलीं, तें सांगितलें पाहिजे. ताळेबंदाचे तारखेस ह्या खातीं असलेली रकम दाखविली, म्हणजे पुरे; वर्षाचे अवधींत त्यांत झालेली घट अगर वाढ स्पष्ट करण्याची आवश्यकता नाहीं.

#### ( ४ ) तारणावर घेतलेलीं कर्जें

( अ ) गहाणावर, ( ब ) डिबेंचर्सवर आणि ( क ) बँकांकडून घेतलेलीं कर्जें, ( ड ) दुय्यम कंपन्यांचीं देणीं ( इ ) तारणावर घेतलेलीं इतर कर्जें आणि ( ई ) तारणावर घेतलेल्या कर्जावर द्यावयाचें व्याज, असे या विभागाचे वर्ग पडतात. तारणावर घेतलेल्या कर्जाची रकम, तीवरील देणें व्याज आणि दिलेलें तारण, हीं सर्व ताळेबंदांत खुलासेवार लिहावीं लागतात.

#### ( ५ ) विगर तारणाचीं कर्जें

ह्या कर्जांचें खालीलप्रमाणें वर्गीकरण करावें लागतें— (अ) बँकांकडून घेतलेलीं कर्जें, (ब) कायम ठेवी, (क) अल्प मुदतीचीं कर्जें, (ड) डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंट्स अगर मॅनेजर्स ह्यांचेकडून घेतलेलीं कर्जें, (इ) द्यावयाचें कर्ज, (ई) दुय्यम कंपन्यांकडून घेतलेलीं कर्जें.

(१) कर्जावरील व्याज देण्याची तारीख ताळेबंदाचे तारखेपूर्वी येत असल्यास त्या रकमेवरील द्यावयाचें व्याज आणि ( २ ) व्याज देण्याची तारीख ताळेबंदाचे तारखेनंतर पडत असली, तर व्याजाची मागील तारीख व ताळेबंदाची तारीख ह्यामधील मुदतीच्या व्याजाचा हिशेब, अशा दोन रकमा ( इ ) ह्या सदरांत येतात.

#### ( ६ ) भागीदारांनीं न नेलेलें डिव्हिडंड

#### ( ७ ) देणीं

( अ ) माल पुरविल्याबद्दलचीं ( ब ) खर्चासंबंधीं, ( क ) स्वीकारलेल्या हुंड्याविषयीं आणि ( ड ) इतर, अशा चार प्रकारचीं देणीं वेगवेगळीं दाखविलीं पाहिजेत.

#### ( ८ ) आगाऊ स्वीकारलेल्या रकमा

विमा कंपनी कित्येक प्रसंगीं पुढील वर्षाचे हप्ते आगाऊ स्वीकारते. वर्तमानपत्रें चालविणाऱ्या कंपन्या पत्रांची वर्गणी आगाऊ घेतात. ज्या रकमांचा मोबदला अशाप्रकारें पुढील वर्षांत द्यावयाचा असतो, त्यांचा समावेश येथें होतो.

#### ( ९ ) नफा-तोटा

नफा-तोटा पत्रक स्वतंत्रपणें प्रसिद्ध करणें कंपन्यांवर आतां बंधनकारक केलेलें असल्यामुळें पूर्वी ह्या शीर्षकाखालीं द्यावा लागणारा तपशील आतां येथें द्यावा लागत नाहीं.

---

### जी. आय. पी. रेल्वेनें केलेल्या उतारूंच्या सुखसोयी

हिंदी रेल्वेजना उतारूंची सोय पहाण्याचें महत्त्व आतां पटूं लागलें आहे, असें दिसतें. पंढरपूरच्या गेल्या यात्रेचे प्रसंगीं जी. आय. पी. रेल्वेनें विशेष व्यवस्था केली होती. हरिपुरा कॉंग्रेसचे वेळींहि बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वेनें उतारूंचे सुखसोयींकडे चांगलें लक्ष पुरवलें होतें. जी. आय. पी. रेल्वेच्या यात्रेकरूंसाठी निघणाऱ्या खास गाड्यांत उतारूंची विशेष सोय ह्यापुढें पाहण्यांत येणार आहे. प्रत्येक आगगाडींतून एक डॉक्टर प्रवास करील आणि उतारूंस औषधोपचार करील. प्रवासांतहि स्नानाची आणि रोजच्या धार्मिक विधींची गैरसोय होऊं नये, ह्या दृष्टीनें वेळापत्रकें आखण्यांत येतील. पिण्यासाठी व स्नानासाठी जरूरीप्रमाणें थंड अगर गरम पाणी मिळेल. प्रवासांत उतारूंचे पैसे सुरक्षित रहावे, ह्याकरितां सेव्हिंग बँकेप्रमाणें व्यवस्था केली जाईल. मुंबई सोडतांना आपले पैसे उतारूंनीं रेल्वेचे स्वाधीन करावे आणि आपल्या जरूरीप्रमाणें ते वेळोवेळ परत मागून घ्यावे, अशी ही योजना आहे. लोकांत रेल्वे प्रवासाची आवड उत्पन्न करून, त्यांचा प्रवास सुखकर करण्यांत रेल्वेजचें आणि उतारूंचे, दोघांचेंहि, हित आहे. एकाचें उत्पन्न वाढतें आणि दुसऱ्यास त्याच्या पैशाचा उत्कृष्ट मोबदला मिळतो.

---

### औद्योगिक मंत्र्यांची परिषद

कॉंग्रेस सत्तेखालील सर्व प्रांतांच्या औद्योगिक खात्यांच्या मंत्र्यांची एक परिषद राष्ट्रसभेचे अध्यक्ष, श्री. सुभाषचंद्र बोस, ह्यांनीं मुंबई येथें बोलावली आहे.

### फेंसामुळें दूध किती भरतें ?

१ दूध काढल्याबरोबर फेंसासकट दुधाचें माप केल्यास गवळ्याच्या दुधांत फेंसाचें प्रमाण सुमारें १२ टक्के किंवा एक अष्टमांश असूं शकतें.

२ धार काढल्याबरोबर माप केलेल्या दुधांत बहुतेक सर्व फेंस असतो. फेंस जिरण्यास थोडा वेळ पाहिजे.

३ दुधांतील सर्व फेंस धार काढल्यानंतर दूध पांच मिनिटें ठेवल्यावर नाहींसा होतो. तसेंच दूध काढल्यावर फडक्यांतून किंवा चाळणीतून गाळल्यानें सर्व फेंस नाहींसा होतो.

४ नेहमींच्या धार काढण्याच्या पद्धतींत दर मिनिटास अर्धा शेर व पांच तोळे असें प्रमाण पडतें.

("शेती आणि शेतकरी" वरून)

---

### "ब्रिटिश हिंदुस्थानांत बनविलेलें"

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत तयार झालेल्या मालाच्या उठावयास सहाय मिळावें, ह्या हेतूनें अशा मालावर थोड्या कमी दरानें आयात जकात घेण्याचें ह्या साम्राज्यांतील देशांचें धोरण आहे, त्यास "इंपीरिअल प्रेफरन्स" असें म्हणतात. हिंदुस्थानांतील देशी संस्थानांत तयार होणाऱ्या मालापैकीं, ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांकडे निर्गत होणाऱ्या मालासहि ही सवलत मिळावी, ह्या उद्देशानें ह्या मालावर "ब्रिटिश हिंदुस्थानांत बनविलेलें" असा शिक्का मारण्यास हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे.

---

### फ्रान्समधील नागरिकांचें उत्पन्न

फ्रान्स देशांतील नागरिकांचें उत्पन्न सर्वसाधारणपणें मध्यम दर्जाचें आहे आणि मोठ्या उत्पन्नाचे नागरिक त्या देशांत फार नाहींत. प्राप्तीवरील कर भरणारांपैकीं निम्या नागरिकांचें सालिना उत्पन्न प्रत्येकीं १,५०० रुपयांपेक्षा अधिक नाहीं आणि तीन चतुर्थांश नागरिकांचें सालिना उत्पन्न ३,१०० रुपयांपेक्षा कमी आहे. पाऊण लक्ष रुपयांपेक्षा जास्त प्राप्ती असणारे सुमारें ४०० नागरिक आहेत; १९३० सालीं इतकीच प्राप्ती असणारे ७०० लोक होते. म्हणजे, मोठ्या उत्पन्नाच्या लोकांची संख्या कमी झाली आहे.

---

### उसाच्या चिपाडांतील संपत्ती

रस काढून घेतल्यानंतर उरणाऱ्या उसाच्या चिपाडांपासून अनेक पदार्थ आतां करतां येऊं लागले आहेत. काँक्रीटच्या रस्त्यांच्या बनावटींत त्यांचा चांगला उपयोग होतो, असा अनुभव आहे. चिपाडांपासून तयार केलेले पुठ्ठे उष्णता अगर थंडी ह्यांपासून रक्षण करूं शकतात आणि त्यांतून आवाज पलीकडे जात नाहीं. सिनेमागृहांतून ह्या पुठ्ठ्यांचा उपयोग वाढत्या प्रमाणांत करण्यांत येत आहे.

---

### आगगाडीचा वेग ताशीं ९६·४३ मैल

रोम ते नेपल्स ये-जा करणाऱ्या आगगाडीस १३५ मैल अंतर तोडावें लागतें. ता. २७ रोजीं तिनें हा प्रवास १ तास २४ मिनिटांत पुरा केला, म्हणजे सरासरी दर ताशीं वेग ९६·४३ मैल इतका पडला. मध्यंतरीं कांहीं वेळ ह्या गाडीनें ताशीं १२० मैल वेग घेतला होता. गाडीची एकूण लांबी १९५ फूट असून तिचें वजन ११७ टन आहे. १,२०० अश्वशक्तीच्या विजेच्या सहा मोटारींनीं तिला वेग दिला जातो.

**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

## " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functious of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**

**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.

(2) We supply Government of Bombay and Government of India publications.

(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.

(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

**द. म. द. शें. ६४चार आणे व्याजानें**

**व**

**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**

देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

**शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या**

एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या

## ठेवी घेणें आहेत

व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.

**आत्माराम रावजी भट,** C/o केसरी कचेरी, पुणें २.

## खंडकऱ्यांच्या संरक्षणाचा कायदा

### बिलाचा मसुदा

मुंबई प्रांतांतील खंडकऱ्यांच्या संरक्षणाच्या बिलाचा मसुदा प्रसिद्ध झाला आहे. हें बिल प्रांतिक असेंब्लीच्या चालू अधिवेशनांत विचारांत घेतलें जाईल. बिलांतील प्रमुख कलमें खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) ह्या कायद्याचें नांव 'बॉंबे टेनन्सी ॲक्ट सन १९३८' असें असावें.

( २ ) "(अ) जानेवारी १९३८च्या पूर्वीचीं ओळीनें सहा वर्षे एकाद्यानें खंडकरी ह्या नात्यानें जमीन कसली असेल, किंवा वरील मुदतींत, ( ब ) त्यानें जमीन स्वतः कसली असेल, आणि ( क ) अशी जमीन खोती, इनामी अगर तालुकदारी पद्धतीखालील खेड्यांत असेल किंवा (२)जमिनीच्या मालकाचे मालकीची १ जानेवारी, १९३८ रोजीं ३३ किंवा त्यापेक्षां जास्त एकर बागाइत जमीन अथवा १०० किंवा अधिक एकर इतर जमीन असेल कीं जिचा वार्षिक सारा १५० रुपयांपेक्षां जास्त आहे" अशा परिस्थितींतील खंडकरी 'संरक्षित खंडकरी' ह्या संज्ञेत येईल.

( ३ ) एप्रिल १९३७ च्या पूर्वीचीं सहा वर्षे ज्यानें वरील प्रमाणें जमीन धारण केली असेल, परंतु त्यानंतर त्याचा जमीन कसण्याचा हक्क जमीनदारानें काढून घेतला असेल, त्याचाहि "संरक्षित खंडकरी" या संज्ञेत समावेश होईल. प्रस्तुत कायदा अंमलांत आल्यानंतर सहा महिन्यांचें आंत त्यानें पूर्वीच्याच अटीवर आपण जमीन करण्यास तयार असल्याचें जमीनदारास लेखी कळविलें तर त्यास जमीन कसण्याचा हक्क पुनः प्राप्त होईल.

( ४ ) ( १ ) जमीनदार आणि खंडकरी ह्यांमधील करारानें ठरलेला, अगर ( २ ) असा ठराव झालेला नसल्यास वहिवाटीनें चालत आलेला, किंवा ( ३ ) अशा वहिवाटीचेहि अभावीं, योग्य असा खंड खंडकऱ्यानें दिला पाहिजे. १ डिसेंबर, १९३८ रोजीं बाकी राहिलेला खंड चार समवार्षिक हप्त्यांत खंडकऱ्यानें भरून टाकला पाहिजे.पहिला हप्ता ३१ मे, १९३९च्या आंत आणि पुढील प्रत्येक हप्ता दर सालच्या ३१ मे च्या आंत जमीनदारास मिळाला पाहिजे.

( ५ ) ( अ ) खंडकरी जोंवर वरील हप्ते वक्तशीर देत आहे, ( ब ) दरसालचा खंड प्रत्येक वर्षी १५ मे चे आंत भरीत आहे, ( क ) जमीनाचा रास्त उपयोग करीत आहे, ( ड ) जमीनीची खराबी होईल असें वर्तन करीत नाहीं, ( इ ) जमीन पोटखंडानें देत नाहीं अगर स्वतः करण्यांस चुकत नाहीं किंवा ( ई ) खंडाबाबतच्या सर्व अटी पाळत आहे,तोंपर्यंत "संरक्षित खंडकऱ्या"चा जमीन कसण्याचा हक्क अबाधित राहील.

( ६ ) ( अ ) जमीनदारास जमीन स्वतः करावयाची असेल किंवा तिचा विनियोग शेतीच्या दुसऱ्या एकाद्या कामाकडे करावयाचा असेल, अथवा ( ब ) बिगरशेतकामाकडे जमीन उपयोगांत आणावयाची असेल, तर एक वर्षाची नोटीस देऊन जमीनदार खंडकऱ्यास काढून टाकूं शकेल. ही जमीन जमीनदारानें तीन वर्षांचें आंत दुसऱ्या खंडकऱ्यास दिली किंवा तीन वर्षांनंतर परंतु सहा वर्षांचे पूर्वी जमीनदार जमीनीचा विनियोग नियोजित कामाकडे करूं शकला नाहीं, तर खंडकऱ्यास पुनः जमीन मिळविता येईल.

( ७ ) जमीनदारास लेखी कळवून एकाद्या खंडकऱ्यानें जमीनींत सुधारणा घडवून आणली असल्यास, त्यास जमीनदारानें काढून टाकलें, तर नुकसानभरपाई मिळेल.

( ८ ) "संरक्षित खंडकऱ्या" च्या मृत्यूनंतर जमीन करण्याचा हक्क खातेदाराच्या वारसाकडे जाईल.

( ९ ) ह्या कायद्यानें "संरक्षित खंडकऱ्यां" स दिलेले हक्क कोणत्याहि कोर्टाचे हुकुमानें हिरावून घेतले जाणार नाहींत आणि हे हक्क गहाणहि टाकतां येणार नाहींत किंवा दुसऱ्यास देऊन टाकतां येणार नाहींत.

( १० ) योग्य खंडाविषयीं बांधा उपस्थित झाल्यास मामलेदाराकडे अर्ज केला असतां त्याचा निकाल १८७९च्या बॉंबे लँड रेव्हेन्यू कोडाअन्वयें केला जाईल.

(११) खंडाच्या रकमेखेरीज इतर कोणतीहि पट्टी खंडकऱ्यावर बसविण्याची जमीनदारास मनाई आहे.

(१२) जमीनदारानें खंड मिळाल्याबद्दल पावती दिली पाहिजे.

## मध्यवर्ती विधिमंडळांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

हिंद-ब्रिटन व्यापारी कराराच्या वाटाघाटी संपण्यास आणखी किती काळ लागेल, हें सांगतां येत नाहीं असें सर महमद झाफरुल्लाखान म्हणाले.

***

टारीफ बोर्डानें योग्य अशा ठरविलेल्या किंमतीपेक्षा ज्यास्त किंमतीस टाटा कंपनीचा माल विकला जातो, हें खरें आहे; तथापि, ह्याचा फायदा केवळ कंपनीसच मिळतो, असें नाहीं. इनकम व सुपर टॅक्स ह्यांचे स्वरूपांत सरकारासहि त्याचा वाटा मिळतो, असा सर झाफरुल्ला ह्यांनीं खुलासा केला.

***

हिंदुस्थानांतील ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांचे संबंधांतील नव्या योजनेमुळें हिंदुस्थान सरकारवर दरसाल १½ कोटींचा बोजा बसणार आहे, असें मि. ऑजिल्व्ही, लष्करी खात्याचे सेक्रेटरी, यांनीं सांगितलें.

***

लष्करांत दाखल झालेल्या हिंदी अधिकाऱ्यांपैकीं अनेकांनीं राजीनामा देऊन अगर बदल्यांची मागणी करून आपण लष्करी नोकरीस लायक नसल्याचें सिद्ध केलें आहे, असें त्यांनीं एका प्रश्नास उत्तर दिलें.

***

हिंदुस्थानांतील प्रमुख रेल्वेजवरील ८२६ स्टेशनांत तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या स्त्रीउतारूंसाठीं स्वतंत्र वेटिंग रूम्सची व्यवस्था आहे.

### सहकारी बँकांची परिषद

मुंबई प्रांतिक सहकारी बँकांची येती परिषद् ता. २७ आणि २८ ऑगस्ट रोजीं भरणार आहे, असें प्रसिद्ध झालें होतें. परिषदेस ता. २६ रोजीं प्रारंभ होऊन ती ता. २७ रोजीं संपेल, असें आतां समजतें.

### प्रांतिक विधिमंडळाचें अधिवेशन

मुंबई प्रांतिक असेंब्लीचें अधिवेशन पुणें येथें आज ता. १७ रोजीं सुरू होणार आहे.

### ग्रेटब्रिटनचें संरक्षणात्मक धोरण

ब्रिटिश सरकार आपल्या देशांतील उद्योगधंद्यांच्या संवर्धनाकरितां त्यांस पैशाचे रूपानें कसें सहाय करीत आहे, ह्याची कल्पना खाली दिलेल्या आकड्यांवरून येईल. खुल्या व्यापाराचा पुरस्कार करणारें ग्रेटब्रिटन आतां स्वतःच संरक्षक उपाययोजना जारीनें अंमलांत आणीत आहे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. राष्ट्रीय आर्थिक धोरण प्रत्येक देशाच्या विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असतें, आणि परिस्थितींत पालट झाला कीं, धोरणाहि बदलावें लागतें. तथापि, ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांनीं ग्रेटब्रिटनमधील परिस्थितीस अनुसरून पुरस्कार केलेला खुला व्यापार ग्रेटब्रिटननें हिंदुस्थानावरहि कित्येक वर्षे लादला आणि त्याचे दुष्परिणाम ह्या देशास भोगावे लागले. अजूनहि, हिंदुस्थान हा आपलें स्वतःचें धोरण आखून तें पार पाडण्यास पूर्णपणें स्वतंत्र नाहीं. पुढील आकडे ग्रेट ब्रिटननें आक्टोबर, १९३१ ते १९३९ अखेर स्वदेशी उद्योगधंद्यांस दिलेल्या सहायाचे निदर्शक आहेतः—

उद्योगधंद्यांस सहाय

| | लक्ष रुपये |
|---|---|
| बीट साखर | २७,०० |
| पशुसंवर्धन | २४,०० |
| जमीन सुधारणा | ३ |
| ओट आणि बार्ली | २६ |
| जहाज वहातुक | ५,०० |
| मासे पकडण्याचा धंदा | १६ |
| घोड्यांच्या अवलादींत सुधारणा | ६ |
| यांत्रिक वहातुक | २ |
| विमानांचा उपयोग | ५ |

---


### " लिक्विडेशन तहकूब करूं नका "

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं त्रावणकोर बँकेबाबत प्राथमिक चौकशी करून मद्रास सरकारच्या मुख्य प्रधानांस लिहिलेलें पत्र आतां प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. चौकशीअंतीं रिझर्व बँकेचा अभिप्राय काय पडतो ह्यावर त्रावणकोर बँकेच्या बाबतींत काय करावयाचें हें ठरवण्यांत येईल असें जनतेस स्वाभाविकपणानें वाटत होतें. रिझर्व्ह बँकेच्या पत्रांतील महत्त्वाचा भाग येथें दिला आहे:— "आम्हीं हें चौकशीचें काम स्वीकारलें,त्यावेळीं आम्हांस आमचें मत ज्यांवरून सत्वर बनवितां येईल,अशा प्रकारचे कागदपत्र मिळतील अशी अपेक्षा होती.मद्रास येथील कागदपत्र अशा स्वरूपाचे नाहींत. आम्हीं नेमलेला अधिकारी आणि तात्पुरते लिक्विडेटर ह्या दोघांनांहि असेंच वाटत आहे.बँकेची वस्तुस्थिति नीट ध्यानांत येण्यासाठी पुरेशी माहिती व्यवस्थित मांडतां येण्यास बराच वेळ लागणार आहे.बँकेच्या पुनर्घटनेच्या मार्गांत कायदेशीर अडचणी तर आहेतच; त्याबरोबरच बँकेच्या शाखांचें जाळें निरनिराळ्या कोर्टांच्या सत्तेखालील क्षेत्रांत पसरलेलें असल्यामुळें ह्या कामास खर्चहि मोठा लागणार आहे. तेव्हां लिक्विडेशनचें काम ह्यापुढें तहकूब करण्याची खटपट करूं नये, अशी आमची सूचना आहे. त्रावणकोर संस्थानांतील आणि संस्थानाबाहेरील बँकेचे धनको ह्यांचेमध्यें पैशाच्या परतफेडीचे बाबतींत भेदाभेद केला जाणार नाहीं, असें संस्थानच्या अधिकारी वर्गानें आश्वासन दिलें आहे."

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA

मुलामुलींकरितां नमुनेदार व उपयुक्त मासिक
आनन्द
वार्षिक वर्गणी-मोठा अंक ३ रु. लहान अंक १ रु.
जुलै १९३८ च्या खास अंकापासून ३३ वें वर्ष सुरू. वर्गणीदार होऊन हें मासिक घेऊन पाहिल्याशिवाय त्याची खरी किंमत कळणार नाहीं. दरमहा नवे नवे पण उपयुक्त व आकर्षक विषय : उठावदार व स्पष्ट चित्रें : नव्या नव्या कल्पना व नवी नवी माहिती यांनीं प्रत्येक अंक सजविलेला असतो जानेवारी १९३९ चा अंक अगदीं लहान मुलांसाठीं मोठ्या टाइपांत व आकर्षक दोन रंगांत काढणार आहोंत. जुलै १९३८ व जानेवारी १९३९ हे दोन खास अंक वरील वर्गणींतच वर्गणीदारांस मिळतील. पत्ता—आनंद कार्यालय, पुणें २

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर



स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११८—० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०३—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८–१० |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९९—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... ... | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११३—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३१—८ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११७—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९६७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११७—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | ११०—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६२—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३७५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४७७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १७४—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (.१००–५० ) २ रु. ... ... | ४१—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९–१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३९—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४५६०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०७—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६२—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २६७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १२८२—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६–१—६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१–६–० |


## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक

### ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९१६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन ) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें. | एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [ खादी भांडाराचे माडीवर

## फराडकर टेलर्स ॲकॅडमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

## रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेपर्यंत मिळून त्याखेरीज रु. ५०००।– रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शें. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस् — एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

**धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.,** लक्ष्मीरोड, पुणें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनकरितां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा — चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्रावीण्य मिळविण्यास सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

## संगीत–मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे **पेढे व बर्फी** वापरा

मोती चौक : : : सातारा

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.